Vol 4 Issue 7 Jan 2015
ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

# Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# ''प्रादेशिकवाद''भारतीय लोकशाही समोरील एक प्रमुख आव्हान

*माने प्रकाश रंगराव*

असोसिएट प्राध्यापक राज्यषास्त्र विभाग आर्टस, सायन्स, ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली किर्लोस्करवाडी (महाराष्ट्र)

***सांराश***

भारत हा जगातील लोकषाही मानणारा सर्वात मोठा देष आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या जवळपास 120 कोटींच्या घरात गेलेली आहे. भारतीय संघराज्यात वेगवेगळी राज्ये व केंद्रषासित प्रदेष मिळून भारतीय संघराज्य तयार झालेले आहे. भारतीय संघराज्याचा विस्तार जम्मू काष्मिर पासून कन्याकुमारी पर्यंत व गुजरात पासून गुवाहाटी पर्यंत अषा खंडप्राय देषात ज्या ठिकाणी हजारो जाती, शेकडो धर्म, पंथ प्रत्येक घटक राज्याची भाषा वेगळी आहे. त्या त्या प्रांतातील विविध जाती समूदायाच्या बोली भाषा, विविध धर्मकल्पना वेगवेगळया आहेत. अशाप्रकारे विविधतेने नटलेल्या देशाला एकसंघ ठेवण्याची किमया ही संसदीय लोकशाही पध्दतीतचं आहे.

***प्रस्तावना :***

आज भारत हे जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. आज भारतीय समाजव्यवस्था पाश्चात्यांच्या उपभोगवादी /चंगळवादी प्रवृत्तीकडे आकर्षित झालेमुळे आणि नैतिकतेच्या पतनामुळे किंवा नितीमूल्यांच्या ऱ्हासामुळे भारतीय लोकशाहीपुढे भ्रष्टाचार, गुन्हेगारी, नक्षलवाद, दहशतवाद, जातीयवाद, भाषावाद, धर्मांधता , भाषाववाद, प्रादेशिकवाद यासारखी आव्हाने उभी आहेत.

***संशोधनाचा उद्देश :***

प्रस्तुत शोध निबंधात भारतीय लोकशाही समोरील ''प्रादेशिकवाद'' या प्रमुख आव्हानाचा राजकीय संदर्भात शोध घेणे आवश्यक आहे.

***संशोधन विषयाची उद्दिष्टये :***

१) प्रादेशिकवादाची संकल्पना स्पष्ट करणे.
२) भारताच्या संदर्भात प्रादेशिकवादाचे स्वरूप पाहणे.
३) प्रादेशिक वादाच्या निर्मितीस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा शोध घेणे.
४) प्रादेशिकवाद निर्मूलनासाठी उपाययोजना सुचविणे.

***संशोधन पध्दती :***

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन आणि विश्लेषण पध्दतीचा अवलंब करून, संशोधन विषयाची संबंधित व्दितीय माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, विशेषांक, वर्तमान पत्रातील लेख, साप्ताहिक इ. आधारे हा शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

***प्रादेशिकवाद म्हणजे काय? :***

प्रादेशिकवाद (त्महपवदंसपेउ) हा 'प्रांतवाद' या नावाने देखील ओळखला जातो. प्रादेशिकवाद म्हणजे देशातील एखाद्या विशिष्ट भागावर

देशापेक्षा अधिक प्रेम करणे.

विशिष्ट प्रदेशातील सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्टयांना राजकीय पातळीवर मान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न प्रादेशिकवादाची विचार प्रणाली करते. भारतासारख्या संमिश्र सांस्कृतिक समाज असणाऱ्या देशात प्रादेशिकवाद हा राजकारणाचा महत्वाचा आधार बनलेला आहे.

### *प्रादेशिकवाद अर्थ :*

राष्ट्र राज्यातील एखाद्या विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांनी प्रादेशिक तत्वाच्या आधारे आपल्या राजकीय अस्मितांची केलेली मांडणी म्हणजे प्रादेशिकवाद होय.

### *प्रादेशिकवादाचे स्परूप :*

भारतीय संसदीय लोकशाही मध्ये प्रादेशिकवाद ही एक मुख्य समस्या समोर आलेली दिसून येते. आज देखील भारतात असे अनेक लोक राहतात. जे स्वत:ला भारतीय नागरिक समजण्याऐवजी विशिष्ट प्रदेशाचा नागरिक समजतात. तसे पाहिले तर भारतीय संविधानाचे एकच संविधान आणि एकेरी नागरिकत्वाची व्यवस्था केली आहे. परंतु भारतीय जनमानसावर प्रांतवादाचा एवढा प्रचंड प्रभाव आहे की त्यामुळे ते लोक संकुचित प्रांतिय भावनेने पछाडलेले आहेत.

भारतीय राज्यव्यवस्थेमध्ये प्रादेशिकवादाची समस्या पुढील चार स्वरूपामध्ये समोर आलेली दिसून येते.

### *१.भारतीय संघराज्यातून वेगळे होण्याच्या मागणीच्या स्वरूपात.:*

भारतीय संघराज्यातून काही प्रांत वेगळे होऊन स्वतंत्र राष्ट्राची मागणी वेळोवेळी करीत आलेले आहेत. काही वर्षापूर्वी दक्षिणेतील राज्यांनी स्वतंत्र द्रविडस्थानची मागणी समोर केली होती.

### *२.वेगळया स्वतंत्र राज्याच्या मागणीच्या स्वरूपात :*

भारतीय संघराज्यातील अनेक घटकराज्यांच्या काही भागात वेगळया राज्याच्या मागणीसाठी वेळोवेळी आवाज उठविला जातो. उदा. महाराष्ट्रात विदर्भ तर गुजरातमध्ये सौराष्ट्र अशा विविध भागात वेगळया स्वतंत्र घटक राज्यांची मागणी होत आलेली आहे.

### *३. पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याच्या मागणीच्या स्वरूपात :*

भारतीय संघराज्यात घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेश असे दोन घटक आहेत. त्यापैकी काही केंद्रशासित प्रदेशाकडून त्यांना पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी वेळोवेळी होत आलेली आहे. त्यापैकी काही वर्षापूर्वी गोव्याला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात आलेला आहे आणि भविष्यात दिल्लीला सुध्दा पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याची शक्यता आहे.

### *४. आंतरराज्य विवादाच्या स्वरूपात :*

अनेक वेळा राज्याराज्यातील विवादांमुळे देखील प्रांतवादाला प्रोत्साहन मिळते आणि हे विवाद भारतीय जनमाणसात प्रांतवादाची संकुचित भावना निर्माण करतो.

वरील स्वरूपात व्यक्त झालेल्या प्रांतवादाने अनेकदा प्रांतांमध्ये उद्रेक, असंतोष निर्माण केलेला आहे. त्यामुळे प्रांतवादाची संकुचित भावना जनमाणसामध्ये रूजवण्यात प्रोत्साहन मिळालेले आहे आणि त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला अनेकदा तडा बसलेला असून लोकशाही विकासाला अडथळा निर्माण झालेला दिसून येतो.

## *विषय प्रवेश :*

जगात सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताला मानाचे स्थान आहे. एकीकडे भारतात विषमतांनी क्षेत्रीय समस्यांना जन्म दिला आहे. या समस्यांमध्ये प्रादेशिकता मुख्य आहे. प्रादेशिकतेने भारतीय लोकशाहीला फार पछाडल्याने स्वातंत्र्यानंतर गेल्या ६५ वर्षात भारतीय लोकशाहीच्या बळकटीला, छेद दिला जात आहे. प्रादेशिकता ही राष्ट्रीय दुर्बलता निर्माण करणारा घटक आहे.

भारतीय लोकशाहीत प्रादेशिकता या समस्येचे मुळ ब्रिटीश शासन कर्त्यांच्या काळात (१९३५ चा कायदा) रोवले गेले. या शासन कर्त्यांनी प्रांताच्या अंतर्गत प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. ब्रिटीश काळात भारताचे स्वरूप मुगलांचे, संस्थानिकांचे प्रदेश असे होते. ब्रिटीशांनी मुगलांचे प्रदेश स्वत:च्या ताब्यात घेतल्यावर भारतात प्रादेशिकतेचा जन्म झाला, असे म्हटले जाते. स्वातंत्र्यानंतर मात्र प्रादेशिकतेचे स्वरूप उग्र बनले आहे. त्याच्या पाठीमागील कारणांचा शोध घेणे महत्वाचे ठरेल.

***प्रादेशिकवादाच्या निर्मितीची कारणे :***

प्रादेशिक वादाची भावना निर्माण होण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यांपैकी काही प्रमुख कारणांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

***१.भौगोलिक विविधता :—***

आपला भारत देश हा अती विशाल देश असल्यामुळे यामध्ये पाहिजे तशी भौगोलिक एकात्मता नाही. त्यामुळे प्रत्येक विभाग प्रांतिकता जोपासल्यागत वाटतो व स्वत:ला इतरांपेक्षा वेगळा समजतो. त्यामुळे प्रांतवादाची भावना निर्माण होते आणि ही प्रांतवादाची भावना लोकशाहीला आव्हान ठरून राष्ट्रीय एकात्मतेमध्ये अडसर ठरु पाहतो.

***२. सांस्कृतिक विविधता :—***

भारतात सांस्कृतिक विविधताही फार मोठया प्रमाणात आहे. उपासना पध्दती, प्रथा परंपरा, वेशभूषा भाषा इ. बाबतीत प्रत्येक प्रांत आपले वेगळेपणा जोपासतो. इथ वर ठीक आहे. परंतू नुसतेच वेगळेपणा जोपासत नाही. तर प्रत्येक प्रांताचा माणूस आपल्या प्रांताच्या संस्कृतीला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतो आणि आपल्या संस्कृतीवर अत्याधिक प्रेम करून इतरांच्या संस्कृतीला तुच्छ समजतो. यामुळे प्रांतवादाची भावना वाढीस लागते आणि ही प्रांतवादाची भावना लोकशाहीला आव्हान ठरून राष्ट्रीय एकात्मतेमध्ये अडथळा निर्माण करते.

***३. प्रादेशिक संघटना :—***

आपल्या देशात अनेक प्रदेशात प्रादेशिक स्तरावर अनेक संघटना निर्माण होतात आणि या प्रादेशिक संघटना लोकांच्या भावनेला आव्हान करून प्रांतवादाला प्रोत्साहान देताना आढळून येतात. अशावेळी या संघटना राष्ट्राचा विचार न करता केवळ आपल्या प्रदेशाचा विचार करतात. आणि यामुळे देखाल राष्ट्रीय एकात्मतेची समस्या अधिक बिकट बनते.

***४.आर्थिक विषमता व विकासाचा असमतोल :—***

काही प्रांताचा आर्थिक व औदयोगीक विकास फार मोठया प्रमाणात झाला तर काही प्रांताची विकासाच्या संदर्भात सतत उपेक्षा केली गेली. या विकासाच्या असमतोलामुळे देखील प्रांतवादाची भावना वाढीस लागली. कारण मागसलेल्या प्रदेशातील लोकांमध्ये त्यामुळे असंतोष निर्माण होतो. व हा असंतोष प्रांतवादाच्या स्वरूपात व्यक्त होऊन लोकशाहीला आव्हान ठरून राष्ट्रीय एकात्मतेमध्ये बाधा निर्माण करतो. त्यामुळे काही घटक राज्यांतील प्रादेशिक विभाग याच कारणासाठी वेगळया राज्याची मागणी करताना दिसतात.

***५. राजकीय पक्ष व नेत्यांची भूमिका:—***

काही राजकीय पक्ष आणि राजकीय नेते आपले महत्त्व वाढविण्यासाठी अनेक वेळा प्रांतवादाचा आधार घेतात. त्यामुळे प्रांतवादाला प्रोत्साहन मिळते. हे नेते आणि पक्ष असा देखावा निर्माण करतात की तेच खरेखुरे या प्रांतातील लोकांचे कैवारी आहेत. परंतु असे करीत असताना ते राष्ट्रवादाचा बळी देत असतात. काही राज्यात तर प्रांतवादाच्या आधारावरच राजकीय पक्ष जन्म घेतात. आणि राष्ट्रीय एकात्मतेमध्ये अडथळा निर्माण करतात.

***प्रादेशिकवादाचे परिणाम:—***

भुमीपुत्र सिध्दांताच्या रूपाने प्रादेशिकता एक ओंगळ प्रकार स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशभर पसरत चाललेला आहे. या सिध्दांतानुसार एखाद्या राज्यात त्या राज्यातील मुख्य भाषा बोलणारे जे रहिवासी आहेत ते त्या राज्याचे मालक आहेत: म्हणजे मुख्य भाषा बोलणारे 'भुमीपुत्र' म्हणजे स्थानिक रहिवाशी आहेत. ते राज्य केवळ त्यांचीच 'जन्मभूमी' आहे: त्या राज्यात राहणारे इतर लोक किंवा तेथील मुख्य भाषा ज्यांची मातृभाषा नाही ते सर्व रहिवासी बाहेरचे परके आहेत. असे समजून आपल्या राज्यात ज्यांना प्रवेश देण्यास किंवा स्थाइक होण्यास विरोध करतात. आपल्या प्रांतातील नैसर्गीक साधन संपत्तीवर आपली मालकी आहे. त्याचा उपयोग आपल्यालाच व्हायला हवा अशा प्रकारे भुमी पुत्राच्या संकल्पनेने आपल्या भारतीय बांधवात विष पेरले गेले. त्यात आसाम मध्ये रेल्वे भरतीसाठी आलेल्या बिहारी तरुणांवर हल्ले झाले व २५ बिहारिंना प्राण गमवावे लागले.

मुंबईला भुमीपुत्रांना रेल्वे भरतीत प्राधान्य द्यावे यासाठी रेल्वे भरती प्रक्रियेत अडथळे निर्माण करण्यात आले होते. त्रिपुरा, अरूणाचल प्रदेश, मिझोराम, मनीपुरा या राज्यातही परप्रांतीयांना विरोध होत आहे. हा सिध्दांत देशहितापेक्षा प्रांत हिताला जास्त महत्व देतो. सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून पताका फडकविणारा भारत संकुचित वृत्तीची जोपासना करतो म्हणून तो प्रगल्भ नाही. हा सिध्दांत लोकशाहीतील स्वातंत्र्याला बाधा पोहचवणारा आहे. भुमीपुत्र सिध्दांत हा कुठेना कुठे भारतीय लोकशाहीच्या विकासाला छेद देणारा आहे असे वाटते.

***स्वतंत्र राज्याची मागणी :—***

एका मोठया घटक राज्यात काही समुहांना आपली कुचंबना होत असल्याचे अनुभवास येत असल्यामुळे ते आपल्या स्वतंत्र राज्याची मागणी करतात. इ.स.१९५६ मध्ये राज्य पुर्नरचना करते वेळेस मोठी राज्ये निर्माण करण्यावर भर होता. नंतर भाषावाद व प्रांतवाद उफाळून आला

त्यामुळे काही राज्याची दोन स्वतंत्र राज्ये निर्माण करण्यात आली. इ.स.१९६६ पूर्वी भाषिकता हा राज्य निर्मितीचा आधार होता. नंतर मात्र अनुभव आला की एक भाविक राज्य निर्माण झाले म्हणजे सर्व घटकांना विकासाची समान संधी मिळतेच असे नाही. एक भाषिक राज्यात देखील प्रगत भागाचे मागास भागावर वर्चस्व प्रस्थापित होते. प्रगत घटक मागास घटकाचे शोषण करतात. शोषणाचे हे सत्र चालुच आहे असे दिसते. भाषावर प्रांत — रचनेनुसार व १६ घटकराज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश होते. त्याचे दुप्पट म्हणजे सध्या २८ घटकराज्ये व ७ केंद्रशासित प्रदेश झाले पण अजून स्वतंत्र राज्याच्या मागण्या चालुच आहेत. म्हणजे. फुटीरतावाद व प्रांतीयवाद भारतात नेहमी अस्तित्वात आहे असेच म्हणावे लागेल. त्यासाठी लोकांनी प्रांतापेक्षा राष्ट्रहिताच्या दृष्टीकोनातून व्यक्ती व समाजाचा कसा विकास साधता येईल हे पाहिले पाहिजे.

या शिवाय प्रादेशिकवादाचे आणखी काही महत्त्वाचे परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

***१) फुटीरतावादी चळवळींचा जन्म :—***

भारताच्या संदर्भात प्रादेशिवादाचा दिसून येणारा सर्वात गंभीर परिणाम म्हणजे या चळवळींनी आपल्या देशामुळे विघटनाचा धोका निर्माण केला आहे. पंजाब व काश्मीर येथील फुटीरतावादी चळवळी हे त्याचे उदाहरण होय. या चळवळींच्या पुरस्कर्त्यानी भारतातून फुटून निघण्याचा आणि आपले स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रचार सतत चालविला आहे.

***२) संकुचीत विचारांना चालना :—***

प्रादेशिकवादामुळे लोकांच्या मनात संकुचित विचार वाढीस लागतात. आपला धर्म, जात, भाषा किंवा संस्कृती इतरांपासून वेगळी आहे. इतकेच नव्हे तर ती इतरांकडून श्रेष्ठ आहे. असे त्यांना वाटू लागते. आणि त्यातूनच इतरांचा व्देष करण्याची प्रवृत्ती त्यांच्या मध्ये निर्माण होते.

***३) स्वायत्ततेची मागणी :—***

प्रादेशिकवादाचा आणखी एक परिणाम त्या—त्या प्रदेशवादातून होणारी राजकीय स्वायत्ततेची मागणी होय. प्रादेशिकवादातून प्रत्येक वेळी फुटीरतेच्या चळवळी जन्माला येतीलच असे नाही. परंतु स्वायत्ततेची मागणी मात्र हमखास पुढे येते असे मात्र दिसून येते. आणि अशा परिस्थितीत केंद्र सरकारने ही राष्ट्रीय ऐक्याला बाधा पोहोचणार नाही अशा पध्दतीने ही मागणी मान्य करने शहाणपणाचे ठरते.

***४) वेगळया घटकराज्याची मागणी :—***

एखाद्या प्रांताच्या विशिष्ट प्रदेशातील जनतेमध्ये वेगळेपणाची भावना निर्माण होते व त्याचा परिणाम म्हणून त्या प्रदेशातील लोक वेगळया घटकराज्याची मागणी करु लागतात. उदा. महाराष्ट्रातही स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी अधुन मधून केली जात आहे.
एकंदरीत प्रादेशिकवाद लोकशाहीला आव्हान ठरून राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेला तडे घालविण्याचे कार्य करतो असेच म्हणावे लागेल.

***अनुमान :—***

प्रादेशिक वादातून लोकशाही विरोधी शक्ती बळावतात आणि विकासात अडथळा निर्माण होतो. या चर्चेतही तथ्य नाही. प्रादेशिकता ही प्रामाणिक व प्रभावी जनभावना असल्यामुळे दडपणेच परिणामत: अधिक भयावह असू शकते. प्रदेशातील लोकात आपल्या स्वायत्त विकासाची आकांक्षा निर्माण होणे हे लोकशाहीच्या वाढीचे लक्षण असते. मध्यवर्ती राजकीय सत्तेशी केवळ भौगोलिकच नव्हे तर मानसिकही दुरावा लोकांच्या मनात असतो. प्रादेशिक सत्ता केंद्र त्यांना सर्वार्थाने जवळचे असते. लोकांचा राजकीय सहभाग वाढविण्यास लोकशाहीच्या विस्तारा इतकीच महत्त्वाची भूमिका प्रादेशिक भावना पारपाडत असते. त्यामुळे प्रादेकशकतेला संकट न समजता तिच्याशी संमतीने संबंध जोडूनच लोकशाहीला बळकटी आणली जाऊ शकते.
या उलट ती दडपण्यामधून मात्र प्रादेशिकतेतील अभिनिवेश वाढतो व त्यातून तिचा स्फोट होतो. तिला विकृत वळण लागण्याची म्हणजेच भारतीय लोकशाहीला बाधक ठरण्याची शक्यता वाढते.

***निष्कर्ष :***

लोकशाही शासन पध्दतीचा मुलाधार लोकांचा सहभाग आहे. भारतीय लोकशाहीची सुटका प्रादेशिकतेपासून करायची झाल्यास लोकांचा सहभाग आवश्यक आहे. लोकांनी ठरविले तर प्रादेशिकतेचे समुळ उच्चाटन करता येऊ शकते. लोकशाहीच्या विकासाचे व नाशाचे मूळ लोकांमध्येच आहे. म्हणून लोकांनी लोकशाहीचा विकास करायचे ठरवले तर प्रादेशिकता असो किंवा आणखी कोणताही मुद्दा असो लोकशाहीचा विकास थांबवू शकत नाही. प्रादेशिकतेमुळे भारतीय लोकशाहीच्या विकासाला मर्यादा पडत आहे. परंतु तरी देखील भारतीय लोकशाही यशस्वी झालेली आहे. भारतातील संपूर्ण जनतेने प्रयत्न केल्यास प्रादेशिकतेला आळा बसेल व स्वतंत्र राज्याच्या मागण्या कमी होतील. लोकांनी संकुचित कृती सोडून आपण सर्व भारतीय एक आहोत. एकमेकांच्या सहाय्याशिवाय आपला उध्दार होणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

***उपाययोजना :–***

भारतीय लोकशाहीचे प्रादेशिकवादापासून संरक्षण करणे ही गंभीर समस्या आहे. आणि ही समस्या सोडविण्यासाठी काही उपाय करता येतील.
१) भारतीय लोकशाहीतील प्रादेशिकतेच्या समस्येचे स्वरूप कमी करण्यासाठी भारतीय शासनाने प्रादेशिक विकासातील असमतोल कमी करणे गरजेचे आहे.
२) लोकशाही विरोधी होण्यासाठी व प्रादेशिकता नष्ट होण्यासाठी परस्परातील भेदभाव नष्ट होऊन एकता निर्माण होणे आवश्यक आहे.
३) लोकशाही यशस्वी होण्यासाठी व प्रादेशिकतेचे उच्चाटन करण्यासाठी जातीभेद विसरून सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याची आवश्यकता आहे.
४) एक बलशाली भारत निर्माण करण्यासाठी प्रादेशिकता विसरून एकोपा, सहकार्य, आपुलकी निर्माण करून देशहितासाठी कार्य केल्यास सदृढ व परिपकव लोकशाही निर्माण होऊ शकते.
५) समाज तोडण्याची भाषा करणाऱ्या राजकीय नेत्यांना वेळीच वेसन घालणे आवश्यक आहे.
६) राष्ट्रीय एकात्मतेची भावना समाजात रूजविण्यासाठी प्रयत्न करणे.

***संदर्भ ग्रंथ सुची :–***

१) डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे – भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण
२) डॉ. सुधाकर जोशी – भारतीय शासन व राजकारण – विद्या बुक पब्लिशर्स
३) डॉ. एकनाथ खांदवे – महाराष्ट्राचे शासन व राजकराण, आरती प्रकाशन
४) डॉ. अशोक जैन – महाराष्ट्र शासन आणि राजकारण – सेठ, प्रकाशन मुंबई
५) प्रा. बी.बी. पाटील – महाराष्ट्र शासन आणि राजकारण – फडके प्रकाशन कोल्हापूर
६) प्रा. के. आर. बंग – विकास प्रकाशन ;विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद
७) डॉ. शोभा कारेकर / डॉ. शरद घोडके – महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण , अंशुळ पब्लिकेशन्स, नागपूर
८) प्रा. अशोक काळे – भारतीय राज्यव्यवस्था – विश्वभारती प्रकाशन नागपूर



***माने प्रकाश रंगराव***
असोसिएट प्राध्यापक राज्यषास्त्र विभाग आर्टस, सायन्स, ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली किर्लोस्करवाडी (महाराष्ट्र)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org